# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 155/2022 दिनांक : 16.04.2022**

## 1)घरफोडी :–

**तामसा :–**दिनांक 15.04.2022 रोजी चे 08.45 वा. ते 15.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी तामसा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाटातील सोन्या चांदीचे दागीने असा एकुण 4,30,000/– रुपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी दादाराव किशनराव चंदणवार, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. तामसा ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 38/2022 कलम 454,380 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री उजगरे, मो. नं. 8975359100** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**भाग्यनगर :–** दिनांक 12.04.2022 रोजी चे 10.30 वा. ते 20.00 वा. चे दरम्यान, **मोर चौक, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा कंपणीची पॅशन प्रो लाल रंगाची मो.सा. क्रं. एमएच–26/जे–6110 किमती 10,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी शेख रशिद रियाज अहेमद, वय 45 वर्षे, व्यवसाय मेकॅनिक रा. मेहबुबनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 126/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2294 हुंडे, मो.क्र. 7083182294** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**उस्माननगर :–**दिनांक 09.04.2022 रोजी चे 07.00 वा. चे सुमारास**, मौजे उमरगा येथे मारोती मंदीरासमोर मोकळया जागेत, नांदेड येथे,** यातील यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस तू लावालावी केल्याने आमच्या पाहुणा हा आमच्या सोबत भांडणे करीत आहे तु आमच्या भांडणात पडु नको म्हणुन वाद घालुन शिवीगाळ केली व थापड बुक्यानी मारहाण करुन उजव्या हाताचे दोन बोटे फॅक्चर केले व साक्षीदार यांना मंदीराचे झेंडयाचे काठीने मारहाण करुन मुक्का मार दिला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शिवाजी गोविंदराव पांचाळ, वय 47 वर्षे, व्यवसाय सुतारकी रा. उमरा ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरन 64/2022 कलम 325, 324,323,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोना/2536 बालाजी राठोड, मो. नं. 8381029490** हे करीत आहेत.

## 4)शासकीय आदेशाचे उल्लंघन :–

**1)हदगाव :–**दिनांक 14.04.2022 रोजी 17.00 ते 22.00 वा. चे दरम्यान, **रामलीला मैदान, तामासा टी पाईंट तामसा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद 05 व सोबत 30 ते 40 लोकांनी गैर कायादयाची मंडळी जमवुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मिरवणुक काढुन शासनाच्या सुचनेचे पालन न करता मिरवणुक काढुन मा. जिल्हाधिकारी साहेब नांदेड यांचे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोह/2342 हंबर्डे, ने. पोस्टे हदगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 128/2022 कलम 143,188 भादवी सह कलम 135 म. पो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री पांढरे, मो.क्र. 818001100** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–**दिनांक 14.04.2022 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **सुमेधनगर कॅनलरोड नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मिरवणुक एका पांढऱ्या रंगाच्या कंटेनर सारखे बनवलेले व डिजे साऊंड सिस्टीम ज्यामध्ये साऊंड बॉक्स, मिक्सर, व एम्पली फायर व लाईट फोकस बसवलेले असे एकुण 68,000/रूपयाचे साहित्य प्रमुख रस्त्यावर मोठया क्षमतेचे ध्वनी प्रक्षेपण यंत्राचा वापर करून ध्वनी प्रदुषण केले. शासनाच्या सुचनेचे पालन न करता मिरवणुक काढुन मा. जिल्हाधिकारी साहेब नांदेड यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री सुनिल अशोक भिसे, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 127/2022 कलम 188 भादवी सह कलम 138, 136, म. पो. कायदा सह कलम 15, 19 पर्यावरण कायदा सह कलम 5, 6 प्रदुषण उल्लंघन प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री कांबळे, मो.क्र. 9823031227** हे करीत आहेत.

**3)शिवाजीनगर :–**दिनांक 14.04.2022 रोजी 16.56 वा. चे सुमारास, **आयटीआय चौक ते कुसूमताई चौक नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने त्याचे मालकीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मिरवणुक मध्ये त्याचे मालकीचे डिजे हा क्रमांक एमएच–26/के 7788 मिरवणुकीमध्ये वाजवी पेक्षा मोठयाने ध्वनी वाजवुन ध्वनी प्रदुषन केले. तसेच पर्यावरण कायदयाचा भंग केला. शासकीय आदेशाचे उल्लंघन करून शासनाच्या सुचनेचे पालन न करता मिरवणुक काढुन मा. जिल्हाधिकारी साहेब नांदेड यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/विश्वदिप रामचंद्र रोडे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 139/2022 कलम 188 भादवी सह कलम 138, 136, म. पो. कायदा सह कलम 15, 19 पर्यावरण कायदा सह कलम 5, 6 प्रदुषण उल्लंघन प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/835, बामणे, मो.क्र. 8308878094** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :–

**1)हिमायतनगर :–** दिनांक 15.04.2022 रोजी 15.10 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखाना हिमायतनगर जाणारे रोडवर हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या एक लोंखडी तलवार ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/1662, सुधाकर लक्समन कदम. ने पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 66/2022 कलम 4/25 भाहका सह कलम 135 म. पो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री महाजन, मो.नं. 9689707038** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–** दिनांक 14.04.2022 रोजी 21.45 वा. चे सुमारास, **पावडे वाईनचे समोरील सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या एक लोंखडी खंजर ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री उमाकांत वैजनाथ पुणे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 138/2022 कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड मो.नं. 9370933727** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड